INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 4.1625(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 12 | JANUARY – 2017

अण्णा भाऊ साठे यांचे कादंबरीविश्व

डॉ. माधव बसवंते
सहाय्यक प्राध्यापक - मराठी , राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड ,
ता .मुदखेड ,जि . नांदेड (महाराष्ट्र)

सारांश

'जे लढतील तेच जगतील' हा क्रांतिकारी मानवमुक्तीचा संदेश अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्य लेखनातून दिला आहे. एक समर्थ वास्तववादी कादंबरीकार म्हणून अण्णा भाऊ साठे हे नाव केवळ महाराष्ट्र आणि भारतापुरते मर्यादित न राहता ते जगविख्यात झाले आहे. अण्णा भाऊंची कादंबरी ही क्रांतिची ठिगणी आहे. समग्र परिवर्तनाची हाक आहे. जातीयवादी समाज व्यवसथेने माणसांची केलेली विद्रुप अवस्था त्यांनी वास्तवपणे शब्दबद्ध केली आहे. सामाजिक न्याय हाच अण्णा भाऊंच्या कादंबरी लेखनाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. दलित माणसांच्या जगण्यात सुख, समृद्धी आणि प्रतिष्ठा निर्माण व्हावी यासाठी अण्णा भाऊंनी आयुष्यभर अक्षर साहित्याच्या माध्यमातून मूल्यांची पेरणी केली. स्वातंत्र्य चळवळ आणि सामाजिक परितर्वनाच्या आंदोलनाला अण्णा भाऊंनी ऊर्जा दिली. धगधगत्या या ज्वालामुखीला त्यांनी, मानवतेचा आत्मस्वर दिला.

अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरी विश्वाचा अभ्यास करीत असतांना अण्णा भाऊ साठे पूर्व कादंबरी वाङ्मय विश्वावर ना.सी. फडके व वि.स. खांडेकर यांचा प्रामुख्याने प्रभाव होता. 'कलेसाठी कला की जीवनासाठी कला ?' या विषयावर साहित्यिकांमध्ये वाद चालू होता. बहुतांश साहित्यिक हे उच्चभ्रू वर्गातील असल्यामुळे दलित, वंचित, उपेक्षित, कष्टकरी, कामगार यासारख्या माणसांच्या जीवन संघर्षाचे चित्रण त्यांच्या कादंबरीत आलेले नव्हते. अशा या कालखंडात अण्णा भाऊंनी कादंबरी लेखनाच्या विश्वात प्रवेश करुन त्यांनी आपल्या कादंबरी लेखनात शोषित, उपेक्षित आणि संघर्षशील माणसांचे चित्रण रेखाटले. अण्णा भाऊ साठे यांनी एकूण चाळीस कादंबऱ्या लेखन केल्याचे दिसून येत असले, तरी प्रत्यक्षात मात्र बत्तीस कादंबऱ्या आपल्या हाती लागतात.

बीजसंज्ञा : अण्णा भाऊंचे कादंबरीविश्व, साहसी चित्रण, महिला समस्यांचे चित्रण, प्रेमचित्रण, ग्राम चित्रण.

प्रस्तावना

अण्णा भाऊ साठे हे मनोरंजनवादी कादंबरीकार नाहीत, तर ते क्रांतिकारी आणि विद्रोही ज्वालाकार कादंबरीकार होते. अण्णा भाऊंनी आपल्या कादंबरी विश्वातून परिवर्तनाबरोबरच, संघर्ष आणि प्रबोधनाचा संदेश दिला. गरीबीने आणि दु:खाने व्यथीत झालेल्या उपेक्षितांचा जीवन संघर्ष त्यांनी जगापुढे उभा केला. 'जी माणसं अन्याय-अत्याचाराच्या विरोधात लढत नाहीत ती माणसं षंढ असतात. अशी माणसं जिवंत असून मेल्यासारखी असतात, तर याउलट लढून मरणारी माणसं मरुनही जिवंतच असतात.' असा क्रांतिविचार अण्णा भाऊंनी आपल्या लेखनातून दिला

आहे. अण्णा भाऊंना जे अमानवीय अपमानास्पद जीवन जगावे लागले, त्याचा उद्रेक त्यांच्या साहित्यातून प्रतिबिंबीत होतो. म्हणूनच त्यांच्या अक्षरांनी धगधगत्या अंगाराचे रुप धारण केले. अण्णा भाऊंच्या कादंबरीने कादंबरी लेखन विश्वाचा मार्गच बदलून टाकला. अशा अण्णा भाऊंच्या कादंबरीमध्ये विद्रोह ठासून भरलेला आहे.

कादंबरीची निर्मिती ही लोकरंजनासाठी होता कामा नये अशी प्रमुख धारणा अण्णा भाऊंची होती. त्यांच्या कादंबरी विश्वातील व्यक्तिरेखा ही अण्णा भाऊंची माणसं असतात. ती त्यांच्या ओळखीची व त्यांना कुठेतरी भेटलेली असतात. म्हूनच अण्णा भाऊंनी आपल्या माणसांचा चेहरा त्यांनी कोणत्याही कादंबरीमध्ये वा इतर वाङ्मय विश्वात कुरुप केला नाही हे विशेष ! माणूसकी हे अण्णा भाऊंच्या व्यक्तिरेखांच्या जगण्याचे सूत्र आहे. अण्णा भाऊंच्या कादंबरीतील परिवर्तन आणि प्रबोधनाचा आवाज हा बुलंद असून तो क्रांतिकारी आहे. दुष्टतेवर कठोर प्रहार करीत करीत मूल्याधिष्ठीत नवसमाजाची निर्मिती करणे हेच अण्णा भाऊंचे ध्येय व लेखनाचे वैचारिक सूत्र होते. अण्णा भाऊ हे मार्क्सवादी लेखक असले तरी समाज व्यवस्थेला आणि पर्यायाने मार्क्सवाद्यांनाही त्यांच्या मनातील धग समजली नाही. तरीही अण्णा भाऊंच्या नैतीकतेचे व न्यायाचे निष्ठाकेंद्र मानवतेसाठी अखेरपर्यंत धगधगत राहिले. म्हणूनच अण्णा भाऊंचे कादंबरीविश्व हे समाज जीवनाचे साहित्य व जीवनदर्शन आहे.

अण्णा भाऊंचे कादंबरीविश्व

अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र कादंबरी वाङ्मयातून त्यांची जीवननिष्ठा स्पष्टपणे जाणवते. अण्णा भाऊ लेखक व्हावे म्हणून कम्युनिष्ट पार्टी प्रयत्नांची शिकस्त करीत होती, असे स्वत: अण्णा भाऊंनी आपल्या चित्रा कादंबरीच्या प्रस्तावनेत स्पष्ट केले आहेत. अण्णा भाऊंनी जवळपास पस्तीस कादंबऱ्यांचे लेखन केल्याचे दिसते. समाजातील धगधगते वास्तव त्यांनी प्रत्येक कादंबरीतून स्वतंत्रपणे अधोरेखित केले आहे. अण्णा भाऊंनी मराठी कादंबरी वाङ्मयाच्या इतिहासात नवा मानदंड निर्माण केला आहे.

कादंबरी लेखनामागे अण्णा भाऊंच्या स्वतंत्र प्रेरणा आहेत. हजारो वर्षापासून अस्पृश्यतेच्या नावाखाली मानवतेची होणारी क्रूर विटंबना व अपमानास्पद वागणूकीमुळे अण्णा भाऊंचे मन पेटून उठले होते. यामुळे वंचित, उपेक्षित आणि शोषित समाजातील स्वाभिमानी व लढावू नायक-नायिकांना न्याय देण्यासाठी अण्णा भाऊंची लेखणी शब्दांना अंगार दिली. त्याशिवाय वंचित, उपेक्षित आणि अंधारात चाचपडत असलेल्या शूर-वीरांना प्रकाशात आणावयाचे होते. अन्याय-अत्याचाराचा प्रतिकार करावा. शील सर्वश्रेष्ठ असून त्याचे पावित्र्य जपावे, विषमतावादी समाज व्यवस्थेतील संघर्ष दाखवून द्यावा अशा कित्येक प्रेरणा घेऊन अण्णा भाऊंनी कादंबरी विश्वात प्रवेश केला. अण्णा भाऊ साठे यांनी पुढीलप्रमाणे कादंबऱ्यांचे लेखन केले आहे. १) अग्निदिव्य, २) अलगुज, ३) अहंकार, ४) आग, ५) आघात, ६) आवडी, ७) कुरुप, ८) केवड्याचं कणीस, ९) गुलाम, १०) चंदन, ११) चिखलातील कमळ, १२) चित्रा, १३) जिवंत काडतूस, १४) डोळे मोडित राधा चाले, १५) तारा, १६) पाझर, १७) फकिरा, १८) फुलपाखरु, १९) मंगला, २०) मयूरा, २१) माकडीचा माळ, २२) मास्तर, २३) मूर्ती, २४) रत्ना, २५) रानगंगा, २६) रानबोका, २७) रुपा, २८) वारणेचा वाघ, २९) वारणेच्या खोऱ्यात, ३०) वैजयंता, ३१) वैर, ३२) संघर्ष, ३३) सैरसोबत, ३४) गुलाम, ३५) ठासलेल्या बंदुका.

अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांची ही संख्या कमी अधिक प्रमाणात दिसून येते. तसेच काही कादंबऱ्या वेगवेगळ्या शीर्षकानेही पुन्हा प्रकाशित झाल्याचे दिसून येतात. अण्णा भाऊंच्या कादंबरी विश्वाचे अभ्यासक, समीक्षक आणि संशोधकांनी आशयानुरुप प्रामुख्याने साहसी चित्रण, महिला समस्यांचे चित्रण, प्रेमचित्रण व ग्राम जीवनाचे चित्रण अशा या चार विषयामध्ये वर्गीकरण करण्यात आलेले आहे. याशिवाय अण्णा भाऊंच्या काही प्रमुख कादंबऱ्यावर चित्रपटांची निर्मितीही करण्यात आलेली असून ती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	कादंबरीचे नाव	चित्रपटाचे नाव	वर्ष
०१	आवडी	टिळा लाविते मी रक्ताचा	१९६१
०२	वैजयंता	बारा गावचं पाणी	१९६१
०३	चिखलातील कमळ	मुरळी मल्हारी रायाची	१९६९
०४	माकडीचा माळ	डोंगरची मैना	१९६९
०५	वारणेचा वाघ	वारणेचा वाघ	१९७०
०६	अलगुज	अशी ही साताऱ्याची तऱ्हा	१९७४
०७	फकिरा	फकिरा	-

साहसी चित्रण

अण्णा भाऊंनी साधारणतः इ.स. १९४८ ते इ.स. १९६९ या कालखंडात कादंबरी लेखन केले असून इ.स. १९४८ मध्ये 'वारणेचा वाघ' या पहिल्या कादंबरीचे लेखन केले असले, तरी ती इ.स. १९५१ मध्ये ती प्रकाशित झाली. अण्णा भाऊंनी कादंबरी विश्वाला आशय, विषयाबरोबरच रचनाबंधाचे नवे आत्मभान देऊन पारंपरिक कादंबरी लेखनाच्या चौकटी बदलून टाकीत प्रस्थापित कादंबरीकारांना त्यांनी अनेक धक्के दिले. इ.स. १९४२ च्या क्रांतिकारी चळवळीवर आधारित 'वारणेच्या खोऱ्यात' ही कादंबरी आहे. ही जसी साहसी कादंबरी आहे, तशीच ती प्रेमाने भारावलेली कादंबरी आहे. या कादंबरीची प्रधान व्यक्तिरेखा 'मंगला' असल्यामुळे ही कादंबरी पुढे 'मंगला' या नव्या शीर्षकाने वाचकापुढे आली आहे. इ.स. १९३७ ते १९४७ या कालखंडात सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यात स्वातंत्र्यासाठी प्राणपणाने लढणाऱ्या क्रांतिकाराचे चित्रण साकारले आहे. भारताचे स्वातंत्र्य, प्रियकर आणि ब्रिटीश धार्जिण्यांशी लढता लढता बलिदान देणाऱ्या 'मंगला' या वीरांगणेची ही साहसी कथा आहे. या कादंबरीत दोन परस्परविरुद्ध गट असून कादंबरीच्या नायकांकडे क्रांतिकारकांची फळी उभी आहे, तर नायकाच्या विरोधी गटात खुनी, दरोडेखोर, चोर, गुंड, संधीसाधू असे समाजकंटक लोक आहेत. अनेक साहसी चित्रणाने ही पहिलीच कादंबरी अण्णा भाऊंच्या उच्च प्रज्ञा आणि प्रतिभेची वाचकांना साक्ष देते.

शतकानुशतके अंधारात राहिलेल्या मांग जातीच्या प्रचंड सामर्थ्याचा व धाडसाचा इतिहास म्हणजे 'फकिरा' कादंबरी होय. या कादंबरीचा नायकही फकिराच आहे. महाश्वेतादेवीच्या बिरसामुंडा कादंबरीपेक्षाही 'फकिरा' ही उच्च दर्जाची कादंबरी आहे. 'फकिरा' या साहित्यकृतीकडे केवळ कादंबरी म्हणून पाहता येणार नाही, तर मानवी स्वातंत्र्याचा आणि मानवी प्रतिष्ठेचा अंतिम उद्घोष करणारी, तत्कालीन समाजव्यवस्थेचे सांस्कृतिक दर्शन देणारे एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून त्याकडे पहावे लागते. फकिराचा आशय विविधांगी असून साधारणतः त्यात दोन तीन पिढ्यांचा वैर व संघर्ष आहे. जोगणी प्रकरणावरुन पेटलेल्या वाटेगाव व शिगाव या दोन खेड्याची संघर्षगाथा आहे. त्याशिवाय दुसरीकडे फकिराला परकीय सत्तेशी करावा लागणारा संघर्षही आहे. या कादंबरीचा आरंभ सूर्यास्ताने होतो, तसाच या कादंबरीचा शेवटही फकिराच्या वीरमरणाने होतो. हातात तलवार घेऊन भीक मागणे फकिराला पसंत नाही. म्हणून फकिरा स्वाभीमानी, पराक्रमी, निर्भय आहे. ही कादंबरी फकिराची संग्रामगाथा आहे. माणुसकीसाठी फकिराचे युद्ध होते. परकीय सत्तेविरुद्ध देशभक्तीने प्राणपणाने लढणारा खरा भारतीय स्वातंत्र्यसैनिक म्हणून फकिराचे नाव सुवर्णाक्षरांने लिहावे लागते. अण्णा भाऊंनी 'फकिरा' कादंबरीच्या माध्यमातून मानवी मूल्यांचा आणि कठोर देशभक्तीचा सर्वोच्च दीपस्तंभ निर्माण केला आहे.

फकिरा कादंबरीनंतर 'मास्तर' ही कादंबरी प्रकाशित झाली असून त्यात एका देशभक्त शिक्षकाचे कथानक आहे. स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी आपणास शस्त्र हाती घेतल्याशिवाय पर्याय नाही. अशा देशभक्त विचारांच्या शिक्षकाचा संघर्ष या कादंबरीत चित्रित झाला आहे. देशी सावकार, भांडवलदार, जमिनदार आणि ब्रिटीशांचा अत्याचाराविरुद्ध बंड पुकारणाऱ्या एका योध्याची शौर्यगाथा म्हणजे 'वारणेचा वाघ' ही कादंबरी आहे. सत्तू भोसले हा या कादंबरीचा लोकनायक आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे सरसेनापती प्रतापराव गुर्जर यांच्या उदात्त जीवनावर आधारलेली 'अग्निदिव्य' ही नाटकप्रधान व शिवकालीन कादंबरी आहे. छत्रपती शिवाजी राजांचा शत्रू विजापुरचा आदिलशहा त्यांचा सेनापती बेहेलोखान यांच्याशी निकराने झुंज देऊन केलेच्या पराभवाचे चित्रण 'अग्निदिव्य' मध्ये साकारले आहे. सरसेनापती प्रतापराव गुर्जर हे या कादंबरीचे नायक आहेत. अशा या साहसी चित्रणाच्या कादंबऱ्यातून अण्णा भाऊ साठे यांनी बंडखोर, क्रांतिकारी, पराक्रमी, शूर, वीर, निर्भय, न्यायी आणि देशभक्तांच्या पराक्रमांचे प्रामाणिकपणे पूजन करीत त्यांच्या पराक्रमाला, शौर्याला व बलिदानाला वंदन केले आहे.

महिला समस्यांचे चित्रण

साहसी अथवा पराक्रमी कादंबऱ्यानंतर महिलांच्या समस्यांचे चित्रण करणाऱ्या अण्णा भाऊंच्या अनेक कादंबऱ्या आहेत. या आशयाच्या वर्गीकरणात प्रामुख्याने चित्रा, वैजयंती, चंदन, चिखलातील कमळ, फुलपाखरु, टिळा लावते मी रक्ताचा, आवडी व रत्ना या कादंबऱ्यांचा समावेश होतो. 'टिळा लावते मी रक्ताचा' ही कादंबरी 'आवडी' या नव्या शीर्षकानेही प्रकाशित झाल्याचे दिसून येते.

'चित्रा' या कादंबरीचा काळ इ.स. १९४५-४६ मधील असून ते एक सत्य कथानक आहे. चित्रा ही मुलगी या कादंबरीची मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. चित्रा आईच्या गर्भात असतांनाच तिचे वडील मृत्यू पावतात. चित्राला घेऊन तिची आई माहेरी जाते. पैशासाठी लाचार झालेला माणूस आपल्याच घरातील व नात्यातील स्त्रियांची मुंबईच्या बाजारात कशी विक्री करतो. मुंबई शहराच्या औद्योगिकीकरणामुळे माणसांच्या नीतिमत्तेवर कसा परिणाम होता याचे यात चित्रण आहे. तमाशा कलावंतांच्या समस्यांवर आधारलेली 'वैजयंता' ही कादंबरी आहे. तमाशातील महिला कलावंतांचे होणाऱ्या लैंगिक, भावनिक, आर्थिक आणि सामाजिक शोषणावर अत्यंत तटस्थपणाने प्रकाश टाकला आहे.

मुंबईतील झोपडपट्टीत क्रूर वासनेने अग्निपरीक्षा घेतलेल्या व शीलरक्षणासाठी दिलेला लढा 'चंदन' मध्ये दिसून येतो. आपल्या शीलाचे पावित्र्य जपीत वासनांध पुरुषांशी 'चंदन' ने केलेला संघर्ष व चंदनचा लढाऊपणा यातून जाणवतो. 'फुलपाखरु' ही कादंबरी सुधारगृहातील मुले व

त्यांच्या गुन्हेगारी जीवनावर आधारीत आहे. 'रोहिणी' या मुलीचे वर्णन 'फुलपाखरु' म्हणून करण्यात येते. रोहीणी ही वेश्या व्यवसाय करते हे माहित असूनही तिच्या समोरच्या झोपडपट्टीत राहणाऱ्या राजा व रोहिणी हे दोघही विवाहबद्ध होऊन आपले नवे वैवाहिक जीवन नव्याने सुरु करतात. 'चिखलातील कमळ' ही कादंबरी मुरळी प्रथेवरील सामाजिक अन्यायाला वाचा फोडणारी कादंबरी आहे. तुळसा आणि सीता या मुरळी स्त्रिया या कादंबरीच्या व्यक्तिरेखा आहेत. 'टिळा लाविते मी रक्ताचा' ही कादंबरी समाज व्यवस्थेतील जातीभेदाच्या भिंती नष्ट करण्याचा प्रयत्न करते. देशाचे रक्षण करणाऱ्या यशवंत नावाच्या सैनिकाच्या पत्नीची कर्मकहाणी 'रत्ना' कादंबरीमध्ये अधोरेखित झाली आहे. भारताच्या ग्रामीण भागात सैनिकांच्या पत्नीचे जीवन किती असुरक्षित आहे आणि देशाचे रक्षण करणारा सैनिक किती चिंताग्रस्त जीवन जगतो आहे, याचे जिवंत दर्शन 'रत्ना' कादंबरीतून होते. यातून अण्णा भाऊंच्या व्यापक जाणिवेचा प्रत्यय येतो.

प्रेम चित्रण

जगातील प्रत्येक भाषेच्या वाङ्मयात प्रेमभावनेचे प्रभावीपणे चित्रण करण्यात आलेले आहे. भारतातील संस्कृत भाषेतील वाङ्मय अनेक प्रेमकथांनी समृद्ध झाले आहे. एकोणिवाव्या शतकात मराठीतील अनेक लेखकांनी प्रेमचित्रणाच्या साहित्यकृतींचे लेखन केले आहे. अण्णा भाऊ साठे यांनी प्रामुख्याने अलगुज, अहंकार, आग, रुपा, आघात, गुलाम, मयुरा, मूर्ती या कादंबऱ्यातून प्रेमचित्रण केले आहे.

प्रेमभावनेचे चित्रण करणारी अण्णा भाऊंची 'अलगुज' ही पहिली कादंबरी आहे. गणू मोहिते या सधन शेतकऱ्याची लाडकी मुलगी रंगी आणि त्यांच्याच घरातील नोकर बापू खरवटे यांच्यातील ही प्रेम कथा आहे. ही कादंबरी एका ग्रामीण चित्रपटासारखीच चित्रमय झाली आहे. 'रानगंगा' या कादंबरीचे शीर्षक कान्हेरी व करुंगाळी या दोन गावांमधून वाहणाऱ्या 'रानगंगा' या नदीवरुन देण्यात आले असून चंदर आणि प्रभा यांची प्रीतीभावना यात व्यक्त झाली आहे. 'संघर्ष' ही सुलभा आणि तिचा प्रियकर आनंद यांची दुर्दैवी प्रेमकथा असली तरी शेवटी दोघेही विवाहबद्ध होतात. 'अहंकार' कादंबरीतून 'अवंतिका' या कमालीच्या अहंकारी स्त्रीचे आयुष्य कसे बरबाद होते याचे दर्शन होते. माणसाचा अहंकारी स्वभाव हाच त्या माणसाचा सुखाचा शत्रू असतो. याचा बोध या कादंबरीतून मिळतो. 'रूपा' या कादंबरीत प्रेमाचा त्रिकोण असून शेवटी दिनकर व रुपा आपल्या इच्छेनुसार लग्न करतात. एका अपूर्ण प्रेमाची कहाणी म्हणून 'आग' कादंबरीकडे पहावे लागते. यात प्रसिद्ध लेखक अनंत चव्हाण हा एका तरुणीच्या प्रेमात पडून तो कसा उद्ध्वस्त होतो याचे चित्रण आहे. 'आघात' मध्ये सर्व सामान्य कामगार वस्तीतल्या माणसाची कथा असून श्याम आणि रोझी यांच्या प्रेमभावनेचे दर्शन आहे. 'गुलाम' मध्ये मनोरंजनात्मक चित्रणाबरोबरच वासू, मिनाक्षी व मथी यांची प्रीती रेखाटली आहे. 'मयूरा' मध्ये एक गरीब मुलगा चंदन व श्रीमंत बापाची मुलगी मयूरा यांच्या प्रेमाचे व विवाहाचे चित्रण आहे. मयूराचे मूळ नाव 'नीलिमा' असले तरी तिला मोर आवडत असल्यामुळे ती पुढे 'मयूरा' या नावाने ओळखली जाते. 'मूर्ती' या कादंबरीत जातिभेदाच्या अमानवीय भिंती नष्ट करुन आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देण्यात आले आहे. वसंत हा या कादंबरीचा नायक असून तो अनाथ आहे. वसंत हा उच्च जातीतील 'मूर्ती' या वर्गमैत्रिणीच्या प्रेमात कसा पडतो याचे प्रभावी चित्रण रेखाटेल आहे.

ग्राम चित्रण

अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र लेखनात ग्रामजीवनाचा विलक्षण प्रभाव आहे. त्यांनी आपल्या लेखनातून ग्रामविश्वातील अनेक पैलूंवर प्रकाश टाकला आहे. अण्णा भाऊंनी माकडीचा माळ, वैर, डोळे मोडित राधा चाले, रानबोका, कुरुप, पाझर, केवड्याचे कणीस या कादंबऱ्यामध्ये ग्राम विश्वाचे दर्शन प्रतिबिंबीत केले आहे.

'माकडीचा माळ' ही ग्रामविश्वाचे दर्शन देणारी सर्वोत्कृष्ट कादंबरी आहे. भटक्या जाती-जामतीचे जीवन, जाती-पोटजाती, सुख-दुख, संघर्ष, रितीरिवाज, विवाह, प्रेम यासह भटक्याचे जीवनच यात पूर्णपणे चित्रित झाले आहे. यंकू या माकडवाल्याची मुलगी दुर्गा आणि सख्या या माकडवाल्याचा मुलगा येमू यांच्यातील प्रेमाचे चित्रण रेखाटण्यात आले आहे. 'वैर' मध्ये श्रीमंत व गरीब यांच्यातील वर्गसंघर्ष व पिळवणुकीचे दर्शन होते. 'डोळे मोडित राधा चाले' या काव्यमय शीर्षकाच्या कादंबरीत 'राधा' या मनमोकळ्या स्त्रीचा हसण्याचा, चालण्याचा आणि बोलण्याचा चुकीचा अर्थ घेतल्यामुळे निर्माण होणाऱ्या संकटाचे दर्शन होते. राधा आणि जगू बुवा यांच्या संयमाचे यात वर्णन आहे. 'रानबोका' ही गण्या या दरोडेखोराची कथा व मोहना, संभाजी चौगुले व लक्ष्मी यांच्या प्रेमत्रिकोणही यात साकारला आहे. 'कुरुप' या कादंबरीमध्ये दोन पाटील परिवारामधील संघर्ष आहे. गावात अरेरावी व गुंडगिरी करणारा बाबा पाटील हा गावासाठी कुरुप आहे. दादा पाटलाच्या संघर्षानंतर हरणाबाईने बाबा पाटलाला गोळ्या घालून गावासाठी कुरुप ठरलेल्या बाबा पाटलाचा कसा काटा काढते याचे चित्रण आहे. 'पाझर' मध्ये खंडूबा, आयूबा, रंगोबा आणि धोंडीबा या चार गावगुंडाच्या चित्रणाबरोबरच चंद्रा व नाना यांच्या प्रेमविवाहाचे चित्रण आहे. गुंड्या पैलवान त्याच्या साथीदाराचे कथानक 'केवड्याचं कणीस' या कादंबरीमध्ये चित्रित झाले आहे. 'तारा' कादंबरीतील कथानक प्रेमाचे असले तरी त्याची पार्श्वभूमी वेगळी आहे. तारा ही अनिल पाटील नावाच्या

डाकूकडे खबरी म्हणून काम करीत असते. ताराला अटक करण्यासाठी आलेला सीआयडी पोलीस ताराच्या प्रेमात पडतो व त्यांचा विवाह होतो. शेवटी अनिल पाटील पोलीसांकडून मारला जातो.

निष्कर्ष

- अण्णा भाऊंनी आपल्या कादंबरी विश्वातून जातीय व्यवस्था, अन्याय, अत्याचार, गुलामगिरी, बलात्कार, भांडवलदार आणि शोषक वृत्तीवर कठोर प्रहार केला आहे.
- अस्पृश्य म्हणून मांग जातीला दिली जाणारी अपमानास्पद वागणूक आणि मांगाचे धाडस, शूरता, वीरता, देशभक्ती, निर्भयता, स्वाभिमान, बंडखोरपणा व बलिदान या अनेक मानवी मूल्यांची संघर्षगाथा 'फकिरा' कादंबरीतून साकारली आहे.
- 'वारणेचा वाघ' ही कादंबरी स्वदेशी आणि परदेशी दडपशाहीविरुद्ध बंड पुकारणाऱ्या स्वातंत्र्यपूजक दत्तू भोसले यांची गौरवगाथा आहे.
- अण्णा भाऊंनी आपल्या साहसी कादंबऱ्याच्या माध्यमातून पराक्रमी लोकनायकांच्या पराक्रमाची जणू क्रांतिपूजाच केली आहे.
- देशाचे स्वातंत्र्य, स्त्रीचे शील आणि पुरुषांचा स्वाभीमान यात कदापिही तडजोड नसते. यात जे तडजोड करतात ते बेचिराख होतात हा क्रांतिकारी संदेश अण्णा भाऊंनी महिला चित्रणविषयक कादंबऱ्यातून दिला आहे.
- अण्णा भाऊंचे समग्र कादंबरीविश्व हे मराठी वाङ्मयाचे सौंदर्य, सामर्थ्य वाढविणारे असून त्यांच्या समग्र वाङ्मयाला संग्रामगाथा म्हटल्यास अतिशयोक्तीचे होणार नाही.
- अण्णा भाऊंनी आपल्या काही मनोरंजनात्मक कादंबऱ्यातून प्रबोधनाची वैचारिक दिशा दिली आहे.
- अण्णा भाऊंचा माणसांच्या श्रमशक्तीवर आणि पराक्रमावर विश्वास असल्यामुळे 'नितिमान माणूस' हास त्याचा साहित्याचा केंद्रबिंदू आहे.
- समाजातील वंचित, पीडित, दु:खी, गुलामगिरी व लाचारीत जीवन जगणाऱ्या माणसांना अमानवीय जीवन आपणास का जगावे लागत आहे हे सांगून त्यांचा उत्कर्ष करण्यासाठी अण्णा भाऊंनी आपल्या हाती लेखणी घेतली आहे.
- जातिव्यवस्थेवर प्रहार, सामाजिक व आर्थिक समतेचा पुरस्कार, स्त्री स्वातंत्र्याची पूजा, श्रमिकांची राज्यक्रांती व मानवतेचे पर्व निर्माणासाठी अण्णा भाऊंचे कादंबरीविश्व पेटलेले आहे.

संदर्भ

१) कोरडे बजरंग, भारतीय साहित्याचे निर्माते अण्णा भाऊ साठे, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.
२) डॉ. सकटे मच्छिंद्र, अण्णा भाऊ साठे एक सत्यशोधक, प्रज्ञा प्रकाशन, कोल्हापूर.
३) डॉ. गुरव बाबुराव, अण्णा भाऊ साठे समाजविचार आणि साहित्यविवेचन, लोकवाङ्मय गृह, मुंबई.